**महाराष्ट्र न्यायिक अकादमी व भारतीय मध्यस्थी केंद्र आणि प्रशिक्षण संस्था**
**उत्तन–गोराई रोड, उत्तन, भाईंदर (प.), जि. ठाणे – ४०१ १०६**

**उदय बा. शुक्ल**
**सहसंचालक**

**दुरध्वनी क्रमांक : ८४३३९९०१०१**
**E-mail-** mjauttsc@aij.gov.in

जा.क्र.मन्याअ / उत्तन / 295 / २०२६ दिनांक : ०६ / ०२ / २०२६

## दरपत्रक निवेदन

मंजूर 'कार्यकारणी ठरावानुसार' अकादमीतील मुख्य इमारतीतील प्रशासकीय कार्यालय खोली क्र. २१६ मध्ये जुन्या फर्निचरचे दरवाजे बनविणे आहे आणि नवीन स्टोरेज कपाट बनविणे आहे. तरी इच्छुक कंत्राटदार यांनी प्रत्यक्ष पाहणी करून सामान, मजूरी, डिझाइन व नकाशासहीत दरपत्रक बंद पाकीटातून उपसंचालकांच्या कार्यालयामध्ये दि. १३.०२.२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत सादर करावेत.

**अटी व शर्ती :–**

१. संबंधीत कंत्राटदार यांनी स्वतःच्या लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर **'प्रशासकीय कक्षातील जुन्याफर्निचरचे दरवाजे व स्टोरेज कपाट बनविण्याचे दरपत्रक'** असे नमूद करावे. सदरचे दरपत्रक 'महाराष्ट्र न्यायिक अकादमी, उत्तन–गोराई रोड, उत्तन, भाईंदर पश्चिम–४०११०६' या पत्त्यावर पोस्टाने किंवा प्रत्यक्षात येउन कार्यालयामध्ये दि. १३.०२.२०२६ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत सादर करावे. त्यानंतर आलेले दरपत्रक कोणत्याही कारणास्तव विचारात घेतले जाणार नाही.

२. दरपत्रकामध्ये वस्तू व सेवा कर समाविष्ट आहे किंवा नाही याचा स्पष्ट उल्लेख करावा.

३. दरपत्रकांमध्ये येणे जाण्याचा खर्च तसेच सामान आणण्याचा खर्च, आवश्यकता असल्यास स्पष्टपणे नमुद करावा.

४. दरपत्रक स्विकारणे किंवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार कार्यालयीन प्रमूखास राहिल.

५. दरपत्रक सादर करण्यापुर्वी नकाशा व डिझाईन सन्माईक, प्लायवुड, विनियर, इ. सामानाचे नमुने अकादमीच्या कार्यकारी समितीच्या पंसतीसाठी व मंजुरीसाठी स्वखर्चाने आणावेत व परत घेवुन जावे.

६. कार्यकारी समितीने पसंत करून मंजुर केलेली नकाशे, डझाईन व साहित्य वापरणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. तसेच लागणारे साहित्यांचा पुरेसा साठा उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

७. दरपत्रक प्राप्त झाल्यानंतर साहित्यांचे नमुने व डिझाईन, दर्जा आणि संबंधित जागेला अनुरूप याला प्राधान्य देण्यात येईल.

८. जागेची पाहणी व मोजणी सकाळी ९.३० ते दुपारी ४.३० या दरम्यान करता येईल. (गुरूवार साप्ताहिक सुट्टीचा दिवस सोडून.)

**दिनांक :** ०६ / ०२ / २०२६

Ubshukla
**(उदय बा. शुक्ल)** 6.2.26
**सहसंचालक**
**महाराष्ट्र न्यायिक अकादमी व**
**भारतीय मध्यस्थी केंद्र आणि प्रशिक्षण संस्था**